mahasarkar.co.in

पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे
भरती परीक्षा - गट - ड
(महाराष्ट्र शासन)

| प्रश्नपत्रिका क्र. | 133342 |
|---|---|

बैठक क्रमांक: 1 8 0 1 0 3 5 1 9 6

परीक्षा दिनांक :०७/११/२०१५
वेळ : ११.०० ते १२.३० (दिड तास)

| | |
|---|---|
| एकूण प्रश्न | १०० |
| एकूण गुण | १०० |

| | |
|---|---|
| एकूण पृष्ठे | १६ |

## भाग - 1 : मराठी

1. "शेतकऱ्यांवर मोठे <u>अरिष्ट</u> कोसळले." अधोरेखित शब्दाची जात कोणती ?
(1) सर्वनाम (2) नाम (3) क्रियापद (4) विशेषण

2. खालील वाक्यातील सर्वनाम ओळखा :
*"हा पहा माझा नवा कुत्रा !"*
(1) पहा (2) नवा (3) हा (4) कुत्रा

3. निश्चितपणे एकवचनी असणारा शब्द ओळखा :
(1) पहाड (2) दगड (3) गड (4) झाड

4. स्त्रीलिंगी शब्द ओळखा :
(1) तबक (2) सूर्य (3) कसरत (4) नमस्कार

mahasarkar.co.in

5. दिलेल्या वाक्यातील क्रियापदाचे योग्य भूतकाळी रूप असलेले वाक्य कोणते

*अमावस्येच्या रात्री गडद काळोख असतो.*

(1) अमावस्येच्या रात्री गडद काळोख असणार.

(2) अमावस्येच्या रात्री गडद काळोख होईल.

(3) अमावस्येच्या रात्री गडद काळोख असेल

(4) अमावस्येच्या रात्री गडद काळोख होता

6. खालील वाक्यातील विरामचिन्ह ओळखा :

*किती सुंदर देखावा आहे हा !*

(1) प्रश्नचिन्ह (2) उद्गारवाचक चिन्ह

(3) पूर्णविराम (4) अर्धविराम

7. खालीलपैकी शुद्ध शब्द ओळखा :

(1) बेशीस्त (2) परीक्षा (3) तरतुद (4) तज्ञ

8. खालील अर्थाचा वाक्प्रचार ओळखा :

*"खूप द्रव्य मिळणे"*

(1) अत्तराचे दिवे लावणे. (2) जिवाची मुंबई करणे

(3) स्वर्ग दोन बोटे उरणे. (4) उखळ पांढरे होणे.



mahasarkar.co.in

9. 'दुष्काळात तेरावा महिना' या म्हणीचा अर्थ खालीलपैकी कोणता ?

(1) मोठा दुष्काळ पडणे.
(2) संकटात भर पडणे.
(3) काहीही खायला न मिळणे.
(4) तेरावा महिना आला की दुष्काळ येतो

10. समान अर्थाचा शब्द निवडा :

*तुरग* -

(1) केसरी
(2) पक्षी
(3) घोडा
(4) कारागृह

11. योग्य विरुद्ध अर्थाचा शब्द निवडा :

आरंभ ×

(1) मध्य
(2) पूर्ण
(3) सुरुवात
(4) अखेर

12. खालीलपैकी जोडशब्द नसलेला पर्याय कोणता ?

(1) वातावरण
(2) बेलभांडार
(3) साफसफाई
(4) सहीसलामत

13. खालीलपैकी अचूक जोडी असलेला पर्याय ओळखा :

(1) फळांची - चवड
(2) पोत्यांची - रास
(3) हरणांचा - जथा
(4) फुलांचा - गुच्छ

14. जसे, पक्ष्यांचा – किलबिलाट, तसे पाण्याचा – ?

(1) खणखणाट
(2) खडखडाट
(3) खळखळाट
(4) खसखसाट

mahasarkar.co.in

15. 'किल्ल्याभोवतीची संरक्षक भिंत' या शब्दसमूहासाठी योग्य असलेला शब्द खालीलपैकी कोणता ?

(1) बुरूज (2) तट (3) गढी (4) खंदक

16. खालील शब्दांचा वर्णमालेनुसार क्रम लावल्यास शेवटचा शब्द कोणता ?

(1) स्वातंत्र्य (2) स्वाद (3) स्वामिनी (4) स्वादिष्ट

17. अधोरेखित शब्दाचा योग्य अर्थ ओळखा :

बळकट दंडातच दंड शोभून दिसतो.

(1) शिक्षा (2) काठी (3) बाहू (4) हात

18. खालीलपैकी उपसर्गघटित नसलेला शब्द कोणता ?

(1) आशीर्वाद (2) आसक्त (3) आमरण (4) आभूषण

19. ______ यांचे पूर्ण नाव आहे डेबूजी झिंगराज जानोरकर.

(1) संत तुकाराम (2) संत चोखामेळा (3) संत शेख महंमद (4) संत गाडगेबाबा



20. खालीलपैकी दिनविशेष व दिनांक यांची चुकीची जोडी ओळखा :

(1) बालदिन - १४ नोव्हेंबर (2) कामगार दिन - १ मे

(3) शिक्षणदिन - ५ सप्टेंबर (4) बालिका दिन - ३ जानेवारी


21. खालील घोषणा पूर्ण करा :

झाडे, ऊन, पाणी, वारा; ______ ला नकोच थारा.

(1) शुद्ध हवा (2) आरोग्य (3) स्वच्छता (4) प्रदूषण

mahasarkar.co.in

**22.** खालील शब्दकोडे पूर्ण होण्यासाठी योग्य पर्याय निवडा :




(1) खर्र, चट, मट, पळ

(2) खळ्ळ, सर्र, वच, मच

(3) सुळ, पट, चट, खर्र

(4) चट, मट, नट, हळ्ळ

खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे निवडा : (प्रश्न-क्रमांक 23 ते 25)

'जिचे हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी' अशी म्हण प्रचलित आहे. बालकांना घडविणे हे फार मोठे कार्य आई करत असते. आपला पाल्य हा ज्ञानी, पंडीत, विद्वान आणि आदर्श नागरिक बनावा अशी प्रत्येक आईची मनिषा असते. परंतु या मार्गावर अनंत अडचणी येत असतात. त्यांना न डगमगता सामोरे जात आपल्या पाल्याचा उत्कर्ष साधण्याची क्रिया फक्त एका आईलाच करता येईल. यासाठी गरज आहे ती म्हणजे शिक्षणाची गंगा घरोघरी पोहोचण्याची !

**23.** आपला पाल्य कसा नसावा असे आईला वाटते ?

(1) ज्ञानी (2) विद्वान (3) पंडीत (4) भ्रष्टाचारी

**24.** 'इच्छा' या अर्थाचा कोणता शब्द उताऱ्यामध्ये आला आहे ?

(1) कार्य (2) उत्कर्ष (3) मनिषा (4) गरज

mahasarkar.co.in

25. शिक्षणाची गंगा घरोघरी पोहोचल्यामुळे खालीलपैकी कोणती गोष्ट घडणार नाही ?

(1) प्रत्येक मूल शिकेल.

(2) प्रत्येक आई साक्षर होईल.

(3) बालके आदर्श नागरिक बनणार नाहीत.

(4) कुटुंबातील स्त्री कुटुंबाला साक्षर करण्याचा प्रयत्न करेल.



mahasarkar.co.in mahasarkar.co.in